# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/०४/२०२४ (मंगळवार) सकाळ**

---

## मांढळ येथील खुन करणाऱ्या गुन्हेगाराला कुही पोलीसांकडून अटक

वृत्त अशा प्रकारे आहे की, पोस्टे. कुही हद्दीतील मांढळ गावात सोनिया शाळेमागे एका व्यक्तीचा मृतदेह मिळुन आल्याच्या माहीतीवरून पोलीस स्टेशन कुही येथील पोलीस घटनास्थळी जावुन मृतदेहाची ओळख पटविली असता सदरचा मृतदेह हा वामनराव बुद्धे, वय अंदाजे ६० वर्ष, रा. वार्ड क्र. ०१ मांढळ ता. कुही याचा असल्याचे निष्पन्न झाल्याने पोलीस स्टेशन कुही येथे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर मृतकाचे मृतदेह उत्तरीय तपासणी करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे पाठविण्यात आले. सदर गुन्हयातील आरोपीचे नाव निष्पन्न करून शोध घेवुन आरोपी नामे नितीन मधुकर जनबंधु वय ४८ वर्ष रा. लष्करीबाग पाचपावली पोलीस स्टेशन जवळ नागपुर ह. मु आदर्श बार ॲण्ड रेस्टॉरेन्ट मांढळ याला अटक करण्यात आली असुन आरोपीने दारू पिवुन झालेल्या झगडयाचा राग मनात धरून मृतकास जिवानीशी ठार केल्याचे कबुल केले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास कुही पोलीस स्टेशनचे प्रभारी ठाणेदार सहा. पोलीस अधिक्षक दिपक अग्रवाल (भापोसे) हे करीत आहे.

कार्यवाही पथक पोलीस मा. अधिक्षक हर्ष पोद्दार सर भापोसे तसेच अपर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राजा पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी ठाणेदार IPS दिपक अग्रवाल पोस्टे कुही सपोनि अमितकुमार आत्राम, पोउपनि हरिहर सोनकुसरे, पोहवा सुधीर ज्ञानबोनवार, पोहवा चागदेव कुथे, पो.शि. रविंद्र मारबदे, रजित मेश्राम, आशिष खंडाईत, दुर्गेश डहाके यांनी यशस्वीपणे पुर्ण केलेली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर